
# "मॅजिक पाटी"




आपल्या आयुष्यात काही महिने, काही तारखा, काही दिवस या ना त्या कारणानं संस्मरणीय ठरत असतात. त्यांचं नातं कधी सुखाशी कधी दु:खाशी तर कधी उच्च कोटीच्या अत्यानंदाशीही असू शकतं. अशीच ७ जून २००५ ही तारीख जास्त महत्वाची ठरली माझ्या आयुष्यात ....!

घटना तशी साधी आणि अगदी सहज घडणारी! जून महिना सुरू झाला की शैक्षणिक विश्वात मोठी धामधूम सुरू होते. शाळा सुरू होतात, नवीन अॅडमिशन्स होतात. के.जी. चे वर्ग, प्राथमिक वर्ग, सेकंडरी वर्ग..... शाळेच्या इमारतीत नवचैतन्य निर्माण होतं....बाळगोपाळ मंडळींचे उत्सुक चेहरे, आनंदी चेहरे मोठे लक्षणीय असतात. नवा वर्ग, नवी तुकडी, नवे शिक्षक, क्रमिका पुस्तकांची, वह्यांची दुकानं, युनिफॉर्मची दुकानं ओसंडून वाहू लागतात. आकर्षक रंगीत दप्तरं, युनिफॉर्म्स, शूज, रंगीबेरंगी विविध आकारांच्या पाण्याचा बाटल्या, मधल्या सुटीत खाण्याचे डबे..... सगळं काही नवं नवीन आणि  आकर्षक! पालकांची लगबग, विद्यार्थ्यांची गर्दी! दर वर्षी हेच दृश्य नव्यानं पाहायचं ! त्यात एक जिवंतपणा असतो, रसरशीतपणा असतो, आनंद असतो.

अशाच या गजबजलेल्या–धामधुमीच्या काळात भाच्यांची नवी शाळा सुरू होणार म्हणून त्यांना भेटायला गेले तर नवा शैक्षणिक खजिना त्यांनी माझ्यापुढे भराभर आणून ओतला. नवी पुस्तकं, वह्या, पेन्सिली, मीही मोठ्या उत्सुकतेनं पाहायला लागले. तेवढ्यात प्रसादनं एक पाटी माझ्यापुढं धरली आणि म्हणाला, “ओळख पाहू काय आहे हे?” मी म्हटलं, “अरे प्रसाद, त्याच्यात काय नवीन आहे. ही तर पाटी दिसतेय!”

“अगं आत्या, ही साधी पाटी नाही, ती एकदम ‘मॅजिक’ पाटी आहे. म्हणजे स्केच पेननं त्याच्यावर वाटेल तेवढ लिहायचं आणि ओल्या कापसानं पुसायचं! पाटी एकदम स्वच्छ!” प्रसादच्या मोठ्या मोठ्या डोळ्यांत निर्माण झालेली आश्चर्याची, आनंदाची भावना मला फार भावून गेली.

मी म्हटलं, ङ्गआता ही मॅजिक पाटी म्हणजे काय भानगड आहे? अरे, आमच्या लहानपणीसुद्धा पाट्या होत्या. अगदी अशाचं मॅजिक पाट्या...”

“आत्या, तुला साधं समजत नाही. जरा वाच त्या पाटीवर काय लिहिलंय.” मी देखील बारकाईनं पाहू लागले. पाटी मोठी आकर्षक होती. वर संदेश होता. ‘बार बार लिखो, बार बार मिटाओ.... Write Out.... Wipe Out!’ मग त्याने एक स्केच पेन माझ्या हातात दिलं आणि “म्हणाला, स्टार्ट...लिही आता ताबडतोब.” मग ते पेन स्वत:च्या हातात घेऊन त्याने

स्वत:च त्या पाटीवर रेघोट्या मारल्या. चंद्र, सूर्य काढले. झाडं काढली. नदी, पर्वत... अगदी त्याच्या मनात जे जे आलं ते पाटीवर उतरवलं. ओल्या कापसानं पुसलं. पुन्हा नव्या आकृत्या, नवी चित्रं... हा खेळ खेळताना तोंडानं पुटपुटत "होता, बार बार लिखो, बार बार मिटाओ!" बघता बघता माझं मन मधीच भूताकाळात गेलं! माझ्या डोळ्यांपुढे दिसत होत्या शाळेत असताना वापरलेल्या असंख्य पाट्या..., खडू, पेन्सिली. प्रत्येक वेळी शाळा सुरू झाली, की नवी स्लेट पाट्या, लाकडी पाट्या..., खडू, पेन्सिली. प्रत्येक वेळी शाळा सुरू झाली, की नवी स्लेट पाटी! पाण्याच्या बोळ्यानं पुसायचं, पेन्सिली, रंगीत खडूनं लिहायचं, परत पुसायची!

माझी स्लेट पाटीसुद्धा 'मॅजिक पाटी'च होती. काळ्या कुळकुळीत नव्या स्लेट पाटीवर माझ्या आत्यानं गिरवायला लावली 'श्री गणेशा' ही अक्षरं, एक ते शंभर अंक, वर्णमाला.... मग पुढं पुढं माझे मीच लिहिलेले 'शिलालेख', गणितातल्या करामती, भूमितीतील विविध आकार – त्रिकोण, चौकोन, वर्तुळ – चित्रं, सारं सारं डोळ्यांपुढे येऊ लागले. खरंच, आम्हीसुद्धा हेच केलं... लिहिलं आणि पुसून टाकलं.

पण त्या स्लेट पाटीवर लिहिता लिहिता तिच्याशी नातं मात्र मैत्रीचं जडलं... ती पाटी म्हणजे माझ्या अंतरंगाचं दालन उघडून टाकणारी फार मोठी शक्ती ठरली. खडूसारख्या जादूच्या कांडीनं तिच्यावर लिहिता लिहिता व्यक्तिमत्वाचे अनेक पदर निर्माण झाले, विविध पैलूंचे साक्षात्कार पडले. पुढे पाट्या गेल्या, वह्या आल्या. नवी दालनं अधिक मोठी झाली, नव्या कक्षा अधिक रुंदावल्या. विस्तीर्ण झाल्या. पण पाटीशी जुळलेलं नातं, जुळलेला अनुबंध अधिकच घट्ट होत गेला. त्या पाट्यांनी आयुष्यात क्रांती घडविली होती, व्यक्तिमत्त्व घडविलं होतं.... खरंच, तिचं–माझं नातं किती जवळंच होतं; पण हे सारं आताच मला का बरं नव्यानं जाणवतंय! लहानपणी किती पाट्या आणल्या, वापरल्या, फुटल्या; पण तिच्याशी जुळलेलं नातं मात्र अभंग राहिलं. त्या नव्या पाटीचा तो नवा स्पर्श प्रत्येक वेळी अनोखा वाटे.

ती पाटी माझ्या मनाचा आरसा होती. मनात जे आलं ते लिहून काढलं, तिनंही शांतपणे त्या साऱ्याचा स्वीकार केला. त्या पाटीशी माझ्या मनातील विचारांचे, भावनांचे सूर अगदी सहज जुळायचे. नव्या पाटीचं आकर्षण कधी कमी झालं नाही. ती नुसती पाटी नव्हती; माझ्या अंतरीच्या जाणिवेची एकमेव साक्षीदार होती. माझी खरीखुरी मैत्रीण – अगदी जीवाभावाची सखी होती. असंख्य आठवणी, असंख्य विचारांनी मनात फेर धरला होता नुसता. माझ्या मुलांसाठी शाळा सुरू होणार म्हणून खरेदी करताना माझी उडालेली गडबड, नव्या पुस्तकांसाठी, वह्यांसाठी कधी एकदा दुकानात जातो म्हणून वाट पाहणारी माझी छोटी मुलं डोळ्यांपुढं आली. ही खरेदी झाल्यानंतर आईस्क्रीमची पार्टी रंगलीच पाहिजे. सारं काही तेच, तसंच....फक्त माणसं बदलली. Every generation plays the same! मी माझ्याच विचारांच्या आवर्तात गुंग. प्रसादनं पुन्हा भानावर आणलं मला.

"अगं आत्या, लिही ना माझ्या पाटीवर...संदेश दे मला!"

'काय लिहू? कसला संदेश देऊ?" ती मॅजिक पाटी माझ्याकडे डोळे मोठे मोठे करून पाहत होती. त्यात होतं एक आव्हान. मला खुणावत होती. ती पाटी स्लेटची नव्हती. तिचं बाह्य रूप बदललेलं होतं; पण तिचा आत्मा? तिचं अंतरंग? बघता बघता तिचा–माझा सूर जुळला, नाद झंकारला, तारा छेडल्या गेल्या आणि त्या सुंदर सुबक पाटीवर शब्दांची जादू घडली. भाव फुलले, भान हरपून त्या स्केचपेननं ती लिहीतच राहिले.

# मॅजिक पाटीचे हृदयगान

पाटी किती सुंदर छान
पहा जरा तिची शान
लिहिता लिहिता हरते भान
आनंदाचे केवढे निधान
पाटी हसते खुदकन कशी
संवाद करते हळूच माझ्याशी
"कर ना कविता माझ्यावर छानशी...."
नाते तुझे माझे अगदी जवळचे
दुसऱ्या कुणाला नाही समजायचे
तुझे विचार तुझ्या भावना
मी जाणते तुझ्या तरल संवेदना....
काना, मात्रा, अकार, उकार
लिही ना शब्द सहज भराभर
माझ्या श्यामल अंगावर
उपमा रुपकांचे अलंकार मनोहर
आशय खुलेल मोठा सत्वर
उमटेल अर्थ त्यातून सुंदर
अनुप्रास जुळता मधुर नाद
कवितेला तुझ्या मोठी दाद
तुझ्या कवितेच देण
माझ्या भाग्याच फार मोठ लेण
प्रेम आनंद भावनेच चिंतन
तुझ्या माझ्या अंतरीचे गूढ स्पंदन
प्रतिभेचा झंकार मनी आनंद घन
सरीवर सरी तृप्त साऱ्यांची मन
मैत्री तुझी माझी राहू दे चिरंतन
फुलू दे विश्वात स्फूर्तीने नंदन

*(सकाळ वृत्तपत्रात प्रसिध्द झालेला लेख)*

C C C C